The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# संत गोरा कुंभार यांच्या अभंगातील विचारदर्शन

**डॉ . संजय बालाघाटे,**
सहा . प्राध्या . ;मराठी विभाग, माधवराव पाटील महाविद्यालय, पालम

**प्रस्तावना :**

महाराष्ट्रातील वारकरी संप्रदाय श्रमण संस्कृतीचा वाहक असलेला अध्यात्मिक पंथ आहे .भक्ती आणि अध्यात्म यांची सांगड त्यांनी मानवी जीवनातील कर्मा सोबत म्हणजेच श्रमा सोबत घालून दिल्यामुळे हा संप्रदाय महाराष्ट्रातील विविध जाती - धर्मात व जनमानसात वर्तमानातही खोलवर रुजून आहे .मूलतः संत नामदेवांच्या ऐतिहासिक सांस्कृतिक क्रांतीमुळे मध्ययुगात वारकरी संप्रदाय निर्माण झाला .संत नामदेवांनी अठरापगड जातीतील मानसात त्यांची आत्मिक व मानसिक उन्नती होण्यासाठी पंढरपूरच्या विठ्ठलाची प्रेरणा व श्रमसंस्कार आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून लोकांना सांगून जनमानसाचे प्रबोधन केले . "नामदेवांच्या अभंगवाणीनेच खेड्यापाड्यातील लोकांत ही आत्मविष्काराची उर्मी निर्माण केली होती,या अमृतवाणीच्या बळावरच नामदेवांनी स्वतःच्या घरात ,स्वतःच्या प्रांतात इतकेच नव्हे तर पुढे उत्तरेकडील भागात थेट पंजाब पर्यंत पंढरीच्या विठ्ठलाची कीर्ती दुमदुमत ठेवली व सर्वांना सुलभ असा नाम भक्तीचा संजीवक योग शिकविला . " ( १ )नामदेवाच्या या ऐतिहासिक कार्यामुळे तत्कालीन कालखंडात ग्रामीण गावगाड्यातील श्रमण जातींमधून अनेक संत उदयास आले . त्यापैकीच ज्यांच्या वाणी आणि विचाराचा प्रभाव नामदेवाच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वावर पडला असे संत म्हणजे गोरा कुंभार . मराठवाड्यातील तेर या प्राचीन गावात राहून आपली विठ्ठल भक्ती आणि प्रपंच यांची उत्तम सांगड घालून संत गोरा कुंभार यांनी अनेक अभंग रचना करून अध्यात्मा सोबत आपल्या विचारात विविध जीवनमूल्ये अभिव्यक्त केलेली आहेत .

**शोधनिबंधाचे स्वरूप :**

" श्री संत गोरोबा काकांनी तत्कालीन भक्तीतील ढोंगीपणा , अवडंबर , बुवाबाजी, जादूटोणा ,अंगात येणे ,पशुहत्या , अधर्मालाच धर्म समजणे, विकृतीला संस्कृती म्हणून सांगणे हे प्रकार खूपच वाढले होते, तेव्हा त्यांनी स्वतःच्या आचरणातून भक्ती ही जीवनाची वृत्ती आहे व खरी भक्तीची समज समाजात उभी केली . " ( २ )म्हणजेच कुंभार या मागास जातीत जन्माला येऊनही वारकरी संप्रदायाचे तत्वज्ञान आपल्या अंतःकरणात रुजवून घेऊन गोरा कुंभार यांनी डोळस भक्तीचा पुरस्कार आपल्या संपूर्ण जीवनात केलेला आढळतो .

वारकरी संप्रदायाचे वैशिष्ट्य म्हणजे कुठल्याही प्रकारचा जातीभेद न बाळगता विविध जाती आणि धर्मातील संतांच्या विचाराचा सन्मान या संप्रदायात मोठ्या प्रमाणात झालेला आहे . खरे तर गावगाड्यात कृषी समाजाची सेवा करून उदरनिर्वाह करणाऱ्या जातीत गोरोबा काका जन्माला आले असले तरी त्यांचा तात्विक व आध्यात्मिक अधिकार खूप मोठा होता .

"केशवाचे ध्यान धरुनी अंतरी ।
मृतिके माघारी नाचत असे ।

विठ्ठलाचे नाम स्मरे वेळोवेळी ।
नेत्री वाहे जळ सद्‌गदात ।
कुलालाचे वंशी जन्मले शरीर ।
तो गोरा कुंभार हरिभक्त ॥ " ( ३ )

अशाप्रकारे गोरोबा काका आपल्या जातीचा उल्लेख करून विठ्ठलाच्या नामस्मरणाचा सोहळा करताना त्यांची होणारी भावविभोर स्थिती या अभंगाच्या माध्यमातून अभिव्यक्त करताना ते उत्कट भक्तीचे दर्शन घडवितात .

" कालोनी माती तुडवीत गोरा ।
आठवीत वरा रखुमाईच्या ।
प्रेम अंगी असे झाकुनी नयन ।
करीत भजन विठोबाचे ॥ " (४ )

हा संत नामदेवांनी गोरोबा यांचा केलेला गौरव यथार्थ आहे . कारण दैनंदिन जीवनात उदरनिर्वाह करण्यासाठी पारंपारिक कुंभाराच्या व्यवसायात चिखल तुडवताना किंवा चाकावर मडकी ,गाडगी करताना अथवा घट उतरताना असो की आवा लावताना असो प्रत्येक वेळी गोरोबाचे चिंतन हे विठ्ठलाचेच असायचे .त्यामुळे त्यांचा विठ्ठल त्यांना त्यांच्या कुंभार आळीमध्येच भेटायचा . या चिंतनातच त्यांनी आपले स्वतःचे लहान मूल पायाखाली मातीत तुडवल्याची दंतकथा ही वारकरी संप्रदायात प्रसिद्ध आहे . यातून एक गोष्ट स्पष्ट होते, ती म्हणजे अखंड नाम चिंतनातून गोरा कुंभार यांनी आपल्या कवितेला आणि अभंगाला आध्यात्मिक प्रतिष्ठा प्राप्त करून दिली . -

" तुझे रुप चित्ती राहो ।
मुखी तुझे नाम ॥
देह प्रपंचाचा दास ।
सुखे करू काम ॥ " ( ५ )

यातून त्यांची नाम स्मरणाबरोबरच प्रपंच आणि कामाच्या संदर्भातील विचारधारा लक्षात येते . -

मुकिया साखर चाखाया दिधली । बोलतं हे बोली बोलवेना ॥ १ ॥
तो काय शब्द खुंटला अनुवाद । आपुला आनंद आधाराया ॥ २ ॥
आनंदी आनंद गिळूनि राहणें । अखंडित होणें न होतिया ॥ ३ ॥
म्हणे गोरा कुंभार जीवन्मुक्त होणें । जग हें करणें शहाणें बापा ॥ ४ ॥

हा एकूण भक्ति संप्रदायात संत नामदेवाच्या सहवासात प्रवास करताना गोरा कुंभार यांची झालेली मनस्थिती उपरोक्त अभंगातून व्यक्त होते . गोरा कुंभार हे सगुण निर्गुण भक्तीचे पुरस्कर्ते असून त्यांच्या विचारावर विसोबा स्वामी म्हणजेच विसोबा खेचर यांच्या विचाराचा मोठा प्रभाव पडलेला दिसतो . मध्ययुगीन कालखंडातील भक्ती चळवळीत विसोबा स्वामी यांच्यावर खूप मोठा अन्याय झालेला दिसतो . विसोबा स्वामी यांनी नामदेव आणि तत्कालीन कालखंडातील विविध संतांना आपल्या ज्ञानाच्या माध्यमातून भक्तिमार्ग दाखविला . त्यांचा भक्तिमार्ग हा खऱ्या अर्थाने श्रममूलक

धारणेतून ईश्वराकडे जातो म्हणून तत्कालीन कालखंडातील प्रत्येक संतांनी परमार्थ एवढेच प्रपंचाला महत्व दिल्यामुळे वारकरी संप्रदाय जनमानसात लोकप्रिय झाला . त्यात संत गोरा कुंभार यांचा वाटा मौलिक आहे . विसोबा स्वामी इतकाच गोरा कुंभार यांचा अधिकार वारकरी संप्रदायामध्ये होता . तो केवळ त्यांच्या ज्ञान शक्तीमुळे ही बाब आपण स्पष्टपणे समजून घेतली पाहिजे . ज्ञान आणि कर्म हे माणसाला आध्यात्मिक दृष्ट्या उन्नत करतात हा त्यांचा सिद्धांत वर्तमान कालखंडातही सार्वत्रिक आहे याची प्रचिती आपणास येते .

**संदर्भ ग्रंथसूची :**

१ . शेणोलीकर हरी श्रीधर ( संपा.),नामदेव गाथा , साहित्य अकादमी नवी दिल्ली ,पुनर्मुद्रन २०१३ ,पृ . क्र . ३३-३४
२ . मोरे सोमनाथ फकीरराव ( संपा.),श्री संत गोरा कुंभार जीवनदर्शन ,प्रकाशक रंजना मोरे औरंगाबाद ,प्रथम आवृत्ती २०१६ पृ .क्र . १३
३ . तैत्रव,पृ . क्र . १४
४ . तत्रैव ,पृक्र . ५१
५ . तत्रैव , पृ . क्र . ६७